**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com





**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटसॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २५५ वा | गुरुवार, दि. २२ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# राज्यात अवकाळीचा तडाखा; महाराष्ट्राला पावसानं झोडपलं



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पाऊस सुरूच आहे. दोन दिवसांपासून मान्सून पूर्व पावसाचा वेग वाढला असून, अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे. या पावसाचा मोठा फटका हा शेतकऱ्यांना बसला आहे. फळबागांचं मोठं नुकसान झालं आहे. दुसरीकडे अचानक आलेल्या या पावसामुळे चाकरमान्यांची देखील चांगलीच धावपळ उडाली आहे.

**जळगावात पावसाची हजेरी**

जळगावमध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे, आज दिवसभर ऊन सावलीचा खेळ सुरू होता, मात्र रात्रीच्या सुमारास जोरदार पावसानं हजेरी लावली. वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली, मात्र हवेत गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळाला आहे. पावसामुळे अनेक भागांमध्ये वीज देखील गूल झाल्याचं पाहायला मिळालं.

**गोंदियाला पावसानं झोडपलं**

गोंदिया जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसानं हजेरी लावली आहे, याचा मोठा फटका रब्बी हंगामातील धान पिकाला बसला आहे. गोंदिया जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने विजेच्या कडकडाटासह जोरदार हजेरी लावली. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रब्बी हंगामात धानाची लागवड करण्यात आलेली असून, अनेक शेतकऱ्यांनी शेतात आपले धान कापून ठेवलेले आहेत. अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. शेतात कापून ठेवलेल्या धानाच्या पेंढ्या पावसात भिजल्यानं त्या खराब होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**अमरावतीमध्ये पावसाचा तडाखा**

दरम्यान दुसरीकडे अमरावतीमध्येही पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली आहे. अमरावती शहरामध्ये धुवाधार पाऊस सुरू आहे. पावसामुळे सायंकाळी घराबाहेर निघणाऱ्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पावसामुळे संत्रा, कांदा आणि इतर पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**हवामान विभागाकडून पावसाचा इशारा**

दरम्यान हवामान विभागाकडून पुन्हा एकदा राज्यात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील तीन ते चार दिवस राज्यातील काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण आणि विदर्भात पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## सोलापूरात मे महिन्यात प्रथमच पावसाची सातत्याने हजेरी

सोलापूर शहर व जिल्ह्याच्या बहुतांश भागात मागील पाच-सहा दिवसांपासून कमी-जास्त प्रमाणात पावसाची हजेरी लागत आहे. बुधवारी सायंकाळीही पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. त्यामुळे यंदाच्या मे महिन्यातील दुसऱ्या पंधरवड्यापासूनच पावसाळी वातावरण पाहायला मिळत आहे.

सोलापुरात दर उन्हाळ्यात एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत तापमान प्रचंड वाढून उष्म्यामुळे अंगाची लाही लाही होते. जून महिना सरत असताही उन्हाळ्याची तीव्रता जाणवत राहते. परंतु यंदा मागील दहा वर्षांत प्रथमच मे महिन्यात वळवाच्या पावसाची नऊ दिवस हजेरी लागली आहे. यात सलग सहा दिवस पाऊस पडत आहे.

चालू मे महिन्यात आतापर्यंत जिल्ह्यात सरासरी ८६.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यात सर्वाधिक १०६.२ मिमी पाऊस मंगळवेढा तालुक्यात पडला आहे. तर, त्या खालोखाल सांगोला तालुक्यात १०३.२ आणि उत्तर सोलापूर तालुक्यात १००.४ मिमी पाऊस झाला आहे. माढा-९२.२, दक्षिण सोलापूर-८९.६, माळशिरस-८६.८, अक्कलकोट-८४, मोहोळ-७८, करमा



# दूध अनुदानात मोठी गडबड

## तीन जिल्ह्यातील २५८ दूध संस्थांची तपासणी सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दरात मोठी घसरण झाल्याने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. मात्र, यातही काही दूध संस्थांनी हात मारल्याचा संशय आहे. सोलापूर, पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील २५८ दूध संस्थांच्या तपासणीसाठी अधिकाऱ्यांसह १९२ कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दुग्ध विकास आयुक्तांनी दिले आहेत.

तीन जिल्ह्यांतील ८० कोटी ६८ लाख रुपये इतके अनुदान देण्याबाबत तपासणी अहवालावर निर्णय अवलंबून आहे. दूध दरात घसरण झाल्याने मागील वर्षी अनुदान देण्याचा विषय पुढे आला.

११ जानेवारी २०२४ पासून प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्यात आले. थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर तेही थेट अनुदान जमा करण्यास सुरुवातीला दूध संस्थांनी विरोध केला.

दुभत्या गायींना टॅगिंग करण्यात आल्याने बोगस जनावरे दाखविता येत नाहीत, असे सांगण्यात आले होते. त्यामुळे पाच रुपये अनुदानासाठी सुरुवातीला फारच कमी दूध संस्थांचे प्रस्ताव दाखल झाले होते. टॅगिंगशिवाय अनुदान फाइल घेतली जात नसल्याने दुसऱ्या टप्प्यात काही संस्थांनी तर सात रुपये अनुदानासाठी आणखीन दूध संस्थांची भर पडली.

अपेक्षेपेक्षा अधिक दूध संकलनाच्या फाइल अनुदानासाठी दाखल झाल्याने दुग्ध विकास आयुक्त कार्यालयाच्या ही बाब लक्षात आली. संशय वाटलेल्या काही दूध संस्थांच्या अनुदान फाइल तपासण्यात आल्या.

त्यामध्ये लाभार्थी शेतकऱ्यांची नावे, बँकांतील तपशील व प्रदान करण्यात आलेल्या रकमेच्या तपशिलात तफावत आढळून आली. अनुदान वितरित करणारी यंत्रणा शासन असल्याने शासनानेच प्रस्ताव तपासणीचे आदेश दिले.

**वीस हजार लिटर संकलन असलेल्या संस्थांची तपासणी**

१) अहिल्यानगर जिल्ह्यातील १२७, पुणे जिल्ह्यातील ६२ व सोलापूर जिल्ह्यातील ६९ दूध संस्थांची तपासणी पथकामार्फत सुरू आहे. प्रति दिन २० हजार लिटरपर्यंत दूध संकलन असलेल्या २५८ दूध संस्थांची तपासणी होणार आहे.

२) अहिल्यानगर, पुणे व सोलापूर जिल्ह्यातील दूध संस्थांची पथकातील अधिकारी ग्राउंडला जाऊन तपासणी करणार आहेत. तपासणी अहवाल आल्यानंतर जी परिस्थिती असेल त्यावर थांबविलेले अनुदान वितरित करणे अवलंबून असल्याचे सांगण्यात आले.

ज्या शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात दूध घातले आहे त्यांचे अनुदान देण्यात येणार आहे. मात्र, काहींनी बनवाबनवी केली आहे. तपासणी ११ जानेवारीपासून दिलेल्या अनुदानाची होणार आहे. सत्य समोर आल्यानंतर प्रत्यक्षात दूध उत्पादकांचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

**- वरिष्ठ अधिकारी**

# पुण्यात ४ जून पासून रंगणार एमपीएल व डब्ल्यूएमपीएल क्रिकेट स्पर्धेचा थरार !

## पुण्यात राज्याची तर सोलापूरसह चार जिल्ह्यात अजय शिर्के विभागीय क्रिकेट अकादमी- आ. रोहित पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येत्या ४ जूनपासून पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या गहुंजे आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर महाराष्ट्र प्रीमियर लीग व वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग या स्पर्धांचा थरार रंगणार असल्याची माहिती महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी बुधवारी सोलापुरात पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र प्रीमियर लीगमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य कुटुंबातील अनेक नवोदित खेळाडूंना योग्य वेळी संधी मिळत आहे. या स्पर्धेमुळे त्यांच्यासाठी भविष्यातील अनेक दरवाजे उघडले आहेत. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेतर्फे (एमसीए) राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला क्रिकेटच्या

(पान 2 वर..)

# अकरावीच्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया लांबणीवर

## ऑनलाइन संकेतस्थळात तांत्रिक अडचणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी अर्ज करताना विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून शिक्षण संचालनालयाने दोन दिवसांचा सराव ठेवला होता. त्यात अनेक विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला.

२१ मे रोजी प्रवेश अर्ज भरताना देखील अशाच अडचणी आल्या. त्यामुळे आता त्या ऑनलाइन संकेतस्थळातील माहिती अधिक सुलभ, विद्यार्थ्यांच्या सोयीची केली जाणार आहे. त्यामुळे प्रवेशाचे वेळापत्रक दुरुस्त करावे लागणार असून ते उद्या (गुरुवारी) प्रसिद्ध केले जाणार आहे.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करताना १० महाविद्यालयांचा पसंतीक्रम टाकावा लागणार आहे. दरम्यान, सध्याच्या वेळापत्रकानुसार १९ मे ते १३ जून असे पहिल्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. पण, २१ मे रोजी संकेतस्थळ व्यवस्थित चालू शकले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोंदणी व प्राधान्यक्रम भरता आलेला नाही. त्यामुळे त्या तांत्रिक दुरुस्तीसाठी तुर्तास संकेतस्थळ बंद करण्यात आले आहे. अर्ज भरताना त्या संकेतस्थळात कोणतीही त्रुटी राहणार नाही, यादृष्टीने तो बदल केला जात आहे. या बाबीमुळे अर्ज भरण्यास काही दिवस विलंब होईल, पण तेवढा वेळ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी देण्याची हमी शिक्षण संचालनालयाने घेतली आहे.

**विद्यार्थ्यांना ई-मेल, मोबाईलवर मेसेज**

प्रवेशासाठी तयार केलेल्या संकेतस्थळात काही तांत्रिक त्रुटी राहिल्या आहेत. आता पोर्टल दुरूस्ती सुरू असल्याने विद्यार्थ्यांना ते कधी सुरू होणार आहे, याची माहिती त्यांच्या ई-मेल व मोबाईलवर मेसेजद्वारे दिली जाणार आहे. दुरूस्तीनंतर विद्यार्थ्यांना कमीत कमी वेळेत सुलभपणे अर्ज भरता येईल, अशी माहिती शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

# तीन हजार कोटींची गुंतवणूक, पण आगीपासून संरक्षण शून्य!

## सोलापूरच्या उद्योगांमध्ये फायर पॉलिसीविषयी उदासीनता



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर आणि परिसरातील लघु आणि सूक्ष्म उद्योगांची संख्या ७० हजारांच्या घरात आहे. यातून सुमारे तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. असे असताना केवळ ३ हजार उद्योगांनीच फायर पॉलिसी काढल्याची धक्कादायक बाब पाहणीत पुढे आली आहे.

फायर पॉलिसी काढलेल्यांचे प्रमाण फक्त ४. २ टक्के आहे. आगीसारख्या दुर्घटना घडू नयेत यासाठी रीतसर फायर ऑडिट करून मग फायर पॉलिसी काढण्यात येते. परंतु, याची सजगात जिल्ह्यातील उद्योजकांत खूपच कमी असल्याचे दिसून येत आहे.

अक्कलकोट रोड औद्योगीक वसाहतीमध्ये बहुतांश यंत्रमाग कारखाने आहेत. शहरात यंत्रमागाचा उद्योग हा पारंपरिक प्रकारचा आहे. त्यामुळे यंत्रमागधारकांची संख्या हजारांमध्ये आहे. याशिवाय, इतर उद्योग देखील वाढत आहेत.

यामध्ये रेडीमेड कपडे, गारमेंट व होजीअरी, युनिफॉर्म उत्पादनांचे उद्योग आहेत. चिंचोली एमआयडीसीत रसायने, रबर ओणि अन्य प्रकारचे उद्योग अधिक प्रमाणात आहेत. यात ज्वलनशील वस्तु आणि पदार्थांचे प्रमाण मोठे आहे. असे असतानी आग लागणारच नाही आणि लागली तरी त्वरित आटोक्यात आणण्यासाठीची यंत्रांना सज्ज असणे अत्यावश्यक आहे.

जीवाची बाजी आावणाऱ्यांवरच आरोप एमआयडीसीतील आगीच्या ठिकाणी अग्निशमन दलांच्या वतीने मंगळवारपर्यंत पाण्याचा मार करून तो परिसर कुलिंग करण्याची प्रक्रिया सुरू होती. जीवाची बाजी लावून आग आटोक्यात आणणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणारे आरोप चुकीचे आहेत. त्यासंबंधित अहवाल सर्व रेकॉर्डसह आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. याला जबाबदार कोण? यावर विचार करण्याची गरज असल्याचे अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी बोलताना सांगितले

(पान 2 वर..)

# सोलापूरात काँग्रेसला धक्का; सिद्धाराम म्हेत्रे शिवसेनेत करणार प्रवेश !



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरात काँग्रेसला शिंदे शिवसेनेने दे धक्का दिला आहे. शिवसेना पश्चिम महाराष्ट्रातील बुरूज मजबूत करत आहे. त्यात त्यांना सोलापूरात मोठा शिलेदार सामील होत आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात शिवसेना अजून मजबूत होईल.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वीच मोठी घडामोड घडल्याने महाविकास आघाडीसमोर मोठे आव्हान उभे टाकले आहे. बडे नेत्यांचे महायुतीमधील इनकमिंग तर महाविकास आघाडीतून आऊटगोईंग सुरू असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक चुरशीची होणार आहे.

**काँग्रेसेला मोठा धक्का**

सोलापूरात काँग्रेसला जबरदस्त राजकीय धक्का बसला आहे. माजी गृहराज्यमंत्री आणि काँग्रेसचे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे शिवसेना शिंदे गटाच्या वाटेवर आहेत. माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सिद्धाराम म्हेत्रे यांच्या पक्ष सोडण्याच्या चचेर्मुळे मुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. सिद्धाराम म्हेत्रे हे काँग्रेसचे माजी आमदार आणि गृहराज्यमंत्री राहिले आहेत. म्हेत्रे शिवसेनेत गेल्याने काँग्रेस जिल्ह्यातून खिळखिळी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**जिल्ह्यात मोठी घडामोड**

सोलापूर महानगरपालिकेसह जिल्ह्यामधील बार्शी, पंढरपूर, अकलूज, करमाळा, कुर्डुवाडी, मंगळवेढा, अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी, मोहोळ, सांगोला या 11 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये निवडणुकीचा बिगूल वाजत आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दुधना नगरपरिषेदसाठी पण स्थानिक समीकरणं महत्त्वाची ठरणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती अशी लढत पाहायला मिळणार आहे. त्यापूर्वीच महाविकास आघाडीला सुरूंग लावण्याचे काम सुरू झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणात सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूरात महायुती आणि महाविकास आघाडीत चुरस दिसून येत आहे. फोडाफोडीच्या राजकारणासह आता एकमेकांना शह देण्यासाठी स्थानिक मुद्यांना हवा देण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून निवडणुका न झाल्याने कार्यकर्ते, नेते अस्वस्थ होते. आता त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत मोठी रसद मिळणार आहे. त्यांना एकमेकांचे उट्टे काढण्याची आयती संधी मिळणार आहे. अनेक राजकीय हिशोब चुकते होणार आहेत.





पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

## आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!


जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू

सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.





अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13

# जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक पर्यटन दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक पर्यटन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हाधिकारी (महसूल) तथा जिल्हा पर्यटन अधिकारी संतोषकुमार देशमुख होते.

कार्यक्रमास उपसंचालक पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय पुणे च्या श्रीमती शमा पवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती. प्रीतम कुंटला, पुंडलिक गोडसे, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. लालासाहेब तांबडे, वेलनेस टुरिझम चे डॉ. व्यंकटेश मेतन, ट्रॅव्हल टुरिझम चे सोमनाथ चडचणकर, चिंचणी ग्रामीण पर्यटन चे मोहन अनपट, कृषी पर्यटन चे लहू अवताडे तसेच एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पाचे उपजीविका तज्ञ प्रवीण कुऱ्हे, विपणन तज्ञ रोहित आदमाने, कृषी पर्यटन तज्ञ रमेश खळदकर, स्थापत्य अभियंता श्री. विनायक जवळकोटे व क्षेत्र समन्वयक राहुल डफळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ITDP प्रकल्प व्यवस्थापक महेश कोडगिरे यांनी केले.

या कार्यक्रमात श्रीमती शमा पवार यांनी कृषी पर्यटन क्षेत्रातील विविध संधी, शासनाचे नवीन उपक्रम, शासकीय कर्जसहाय्यता योजना, तसेच पर्यटन केंद्र नोंदणी प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच ह्लआईह्ल योजने अंतर्गत पर्यटन क्षेत्रात महिलांना प्राधान्य देण्यात येत आहे.

तसेच संतोषकुमार देशमुख यांनी जिल्ह्यातील विविध ७५ पर्यटन स्थळाबाबत योगदान, सोलापुरातील उत्कृष्ट जीवन शैली, गट पर्यटन, धार्मिक पर्यटन तसेच जिल्ह्यात लवकरच पर्यटन समिती स्थापन होईल या बद्दलची माहिती दिली.

श्रीमती. प्रीतम कुंटला यांनी शासन निर्णयानुसार व जुलै २०२४ मध्ये झालेल्या बैठकी बाबत सांगताना रोजच्या आयुष्यात पर्यटन कसे गरजेचे आहे व इत्तर राज्य पर्यटनात कसे अग्रेसर आहे हे सांगितले व पर्यटन आराखड्याची मांडणी केली. महेश कोडगिरे यांनी सोलापुरातील खाद्य पद्धती, मनोरंजन याचा उपयोग करून कृषी पर्यटन आकर्षण कसे करू शकता या बद्दल माहिती दिली तसेच पर्यटनात कोण कोणत्या गोष्टी वापरून पर्यटन वाढवता येईल या बद्दल मार्गदर्शन केले. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी पर्यटनात मेडीकल टुरिझम याची संकल्पना मांडली व त्याचा फायदा कसा होऊ शकतो या बाबत माहिती दिली. डॉ. लालासाहेब तांबडे यांनी कृषी पर्यटनासाठी प्रशिक्षणाबद्दल माहिती दिली व तसेच त्यांचा जम्मू काश्मीर येथील पर्यटनाचा अनुभव सांगितला तसेच सेंद्रिय शेती व याचा पर्यटनातील फायदा ह्या बाबत देखिल माहिती दिली. मोहन अनपट यांनी आपला चिंचणी कृषी पर्यटना बाबत अनुभव सांगितला व यात येणाऱ्या अडचणींवर कशी मात करता येईल या बाबत माहिती दिली. सोमनाथ चडचणकर यांनी सध्या सोलापुर जिल्यातील टूर्स बाबत माहिती देताना पर्यटकांचा ओढ हा कुठे असतो या बाबत माहिती दिली. लहू अवताडे यांनी आपला कृषी पर्यटनातील अनुभव सांगितला व भविष्यात शासनाचे धोरणांचा फायदा घेऊन पर्यटन कसे वाढवू शकतो या संदर्भात मार्गदर्शन केले तसेच सर्व कृषी पर्यटन केंद्र चालकांनी एकत्र येऊन काम करण्यासाठी आव्हान केले.

कार्यक्रमात विद्यमान कृषी पर्यटन केंद्र चालक, नव्याने कृषी पर्यटन केंद्र स्थापन करू इच्छिणारे शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, महिला बचत गट, तसेच जिल्ह्यातील विविध पर्यटन क्षेत्रात स्वारस्य असलेले नागरिक असे एकूण ८७ प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आभार कृषी पर्यटन तज्ञ श्री. रमेश खळदकर यांनी मांडले आणि तदनंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चिंचोलीकाटी ग्रामपंचायतीच्या विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांचे धरणे आंदोलन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** एमआयडीसी कडून चिंचोलीकाटी ग्रामपंचायत टॅक्स मिळत नाही, यासह ग्रामस्थांच्या गेलेल्या जमिनीच्या बदल्यात मिळणारा एक गुंठा प्लॉट ही अद्याप मिळाला नाही, यासह गावासाठी पिण्याच्या पाण्याची सोय तात्काळ करावी, या मागणीसाठी बुधवारपासून ग्रामपंचायत सदस्य प्रा. महेश भोसले यांनी ग्रामस्थांसमवेत बेमुदत धरणे आंदोलन एमआयडीसी कार्यालय समोर सुरू केले आहे.



एमआयडीसी मध्ये ग्रामपंचायत असूनही नागरिकांना १५ ते २० दिवस पिण्याचे पाणी मिळत नाही. पयार्याने २४ तास पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची गरज आहे. यासह २०२०-२१ नंतर ग्रामपंचायतील कोणत्याही प्रकारचा टॅक्स देण्यात आलेला नाही. सर्व कंपनीने टॅक्स जमा केलेला असूनही देण्यात येत नाही. त्यामुळे विकास कामासाठी टॅक्स लवकर देण्याची सोय करावी, यासह गावातील शेतकऱ्यांची जमीन एमआयडीसीला गेलेली आहे. त्या बदल्यात एमआयडीसी कडून एक गुंठा प्लॉट मिळतो, मात्र मागील बारा वषार्पासून पाठपुरावा करूनही आणि त्याचे पैसे पूर्ण भरून सुद्धा अद्याप पर्यंत प्लॉट मिळालेला नाही, तरी वरील मागणीची पूर्तता तात्काळ करावी, या मागण्यांसाठी दि.२१ मे रोजी एमआयडीसी कार्यालयाच्या समोर ग्रामस्थासमवेत आंदोलन सुरू करण्यात आले असून यावेळी प्रशासनाने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला मात्र सर्व मागण्या ची पूर्तता केल्याशिवाय हे बेमुदत धरणे आंदोलन थांबवणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यानी घेतली आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य महेश भोसले, विक्रम भोसले, शरपोद्दीन शेख, योगेश भोसले, अंकुश गुंड, विष्णु भोसले, गोरख पवार, राजेंद्र भोसले, मच्छिंद्र पवार, विकास भोसले, यून्नूस शेख, शहाजी भोसले, मारुती कोळी, किसन धोत्रे, लक्ष्मण मदने, दिनेश भोसले, संभाजी सावंत आदिसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# अनुसुचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांचा सोलापूर दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे अनुसुचित जाती जामाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे शुक्रवार दि.23 मे 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.

पुणे येथून मोटारीने सकाळी 09.00 वा.सोलापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन. सकाळी 10.00 वा. शासकीय विश्रामगृह येथे पोलीस अधिक्षक सोलापूर यांचे सोबत जिल्ह्यातील ॲट्रोसिटी प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याबाबत आढावा. सकाळी 11.00 वा. मुख्याधिकारी पंढरपुर नगर परिषद, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकरी बाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी 120.00 वा. मुख्याधिकारी सांगोला नगरपरिषद येथील लाडपागे समितीच्सा शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी 01.00 वा. मुख्याधिकारी अनगर नगरपरिषद, लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी 02.00 वा. मुख्याधिकारी श्रीपूर नगर परिषद, लाडपागे समितीच्सा शिफारशी नुसार, नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी 02.00 ते 02.30 वाजेपर्यंत राखीव.

दुपारी 3.00 वा. मुख्याधिकारी वैराग नगरपरिषद, लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार, नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. सायं. 05.00 वा. मुख्याधिकारी कुर्डुवाडी नगर परिषद, लाड पागे समितीच्या शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचाऱ्यांचे प्राप्त निवेदने व त्यावरील कार्यवाही बाबत आढावा बैठक. व त्यानंतर सोयीनुसार मोटारीने पुण्याकडे प्रयाण करतील.

# टेंभुर्णीत भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना पक्षाचे मुख्य नेते माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व सध्याचे उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार माढा लोकसभा शिवसेना संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली टेंभुर्णी तालुका माढा जिल्हा सोलापूर येथे २१/०५/२०२५ रोजी काढण्यात आली परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरू झालेली भव्य दिव्य मोटरसायकल रॅली छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ छावा चौक (अकलूज चौक) येथे विसर्जित करण्यात आली

टेंभुर्णी शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले अण्णाभाऊ साठे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली तिरंगा रॅलीचे ठिकठिकाणी फटाक्याची आतषबाजी करून स्वागत करण्यात आले

यात्रेमध्ये प्रामुख्याने सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे परांडे मॅडम विनोद पाटील नितीन बापू कापसे तात्यासाहेब गोडगे आनंद टोणपे योगेश जाधव अमोल शेठ जगदाळे विठ्ठल आबा मस्के राजेंद्र ढेकणे राजेंद्र येवले फाईव्ह पटेल सुधीर बापू महाडिक कैलास सातपुते सर सतीश नेवसे सुनील निकम सज्जन ढवळे गणेश ढवळे अण्णा ढवळे राहुल ढवळे बेंबळे गावचे सरपंच विजय पवार जीवन लांडे रास्तापुरे सुदर्शन गायकवाड प्रवीण मस्के जयवंत पोळ सुरेश भाऊ लोंढे अमोल धुमाळ अमर शेंडे यशपाल लोंढे डी एस गायकवाड सर विठ्ठल गायकवाड सचिन श्रीखंडे प्रशांत महाडिक दत्तात्रय कवडे संतोष साळवे अमेर काजी असे हजारो कार्यकर्ते दुचाकी गाडीसह तिरंग्या झेंड्या सह उपस्थित होते.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

जा.क्र.साआअ/जल/२६९ **पाचवी मुदतवाढ** दि.२०/०५/२०२५

सोलापूर म.न.पा.चे विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वसती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे चौथी मुदतवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171591_1, 2)Tender ID-2025-SMC-1171434_1, 3)Tender ID-2025-SMC-1171604_1, 4)Tender ID-2025-SMC-1171637_1, 5)Tender ID-2025-SMC-1171653_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.२२/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# शहर गुन्हे शाखेकडून ६,७९,६२०/- रु किंमतीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखु जप्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिनांक १९/०५/२०२५ रोजी, शहर गुन्हे शाखेकडील, पो.स.ई./मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक पोलीस आयुक्तालय हद्दित गस्त करीत असताना, अमर ज्योती नगर, मुळेगांव रोड सोलापूर येथे अवैधरीत्या गुटखा व सुगंधी तंबाखु साठवुन ठेवले असल्याची गोपनिय माहिती प्राप्ती झाली होती. त्याअनुषंगाने, सदर ठिकाणी पोसई/मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकांनी अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांना बोलावून, सदर ठिकाणी छापा टाकुन, इसम नामे साजिद कय्युम नदाफ, वय २४ वर्षे, रा. घ. नं.३४८, उत्तर कसबा, पंजाब तालीम जवळ, सोलापूर याने, पत्र्याचे शेडमध्ये साठवुन ठेवलेला RMD पान मसाला, M सुगंधी तंबाखु, विमल पान मसाला, V-१ सुगंधी तंबाखु व विना लेबल सुगंधी तंबाखु, असा एकुण ६,७९,६२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यानुसार, इसम नामे- साजिद कय्युम नदाफ याचेविरूध्द, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.नं.४४४/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३, २७४, २७५, १२३ सह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६ (२) (i), २६ (२) (ii) २६(२) (iv) २७ (३) (E), ३० (२) (A), ५९ अन्वये, गुन्हा नोंद करणेत आला आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# वैशपायन स्मृती शासकीय महाविद्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वैशपायन स्मृती शासकीय महाविद्यालय सोलापूर येथेह्ल दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्चार रुग्णालयाचे अधिष्ठाता संजीव ठाकूर यांच्यासमोर डॉः वर्षा राम कोकणे (सहायक प्राध्यापक सूक्ष्मजीव शास्त्र विभाग) यांनी प्रतिज्ञा वाचून शपथ घेण्यात आली,यावेळी महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी शैलेश जाधव, लक्ष्मी मेळकुंदे, सहाय्यक प्राध्यापकः डॉ अपेक्षा चोपडे, डॉ मनोज वेदपाठक, व विविध अधिकारी उपस्थित होते.

**प्रतिज्ञा**

आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभिर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णु करु, तसेच मानवी जिवीत मूल्ये धोक्यात आणणा-या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करु.

# शालेय विद्यार्थ्यांच्या दाखले वाटपसाठी तालुक्यात विशेष शिबीर

## ॲड. राजेश कांबळे खून खटल्यास पुन्हा प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ॲड. राजेश श्रीमंत कांबळे वय 45 राहणार 43, ब्रह्मचैतन्य नगर नवीन आर. टी. ओ. सोलापूर याचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, अँड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू झाला.

खटल्याच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार नितीन मच्छिंद्र कांबळे याने आपल्या साक्षीत दिनांक 25/06/2019 रोजी यातील आरोपी सुरेश चव्हाण याने दुसरा पंच भारत गुणापुरे व एसीपी सकळे यांच्या समोर स्वतःहून निवेदन दिले की मयत राजेश कांबळे याचा खून करून त्याच्या वाट्यास आलेले दोन सोन्याच्या चैन काढून देतो चला असे म्हणून निवेदन दिले त्याप्रमाणे त्याने त्याच्या घरात असलेल्या कपाटातून दोन सोन्याच्या चैन काढून दिल्या व त्या चैन वर एन आर डी असा ठसा होता. त्या चैन जप्त करून पोलिसांसमक्ष पंचनामा केला. अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदवली.

दुसरा साक्षीदार सागर मदन गागडे यांनी आपल्या साक्षीत दिनांक 12. 6.2019 रोजी त्यास बंटी खरटमल रहात असलेल्या घराजवळ घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलावले होते त्याप्रमाणे घटनास्थळावर दोन काळे रंगाचे प्लास्टिकचे पोते दिसून आले त्यामध्ये एका पोत्यात दोन हात,दोन पाय व मुंडके असे होते तर दुसऱ्या पोत्यात हात पाय व मुंडके नसलेले धड होते. त्या ठिकाणाहून लोखंडी हातोडा, कोयता व सत्तुर अशा एकूण 26 चीज वस्तू घटनास्थळावरून जप्त करण्यात आले. त्या ठिकाणी बोटांचे ठसे हे मिळून आले. पंचनाम्याचे चित्रकरण देखील करण्यात आले होते. अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविली.

या खटल्यात विशेष सरकारी वकील अँड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे अँड. मिलिंद थोबडे अँड. विनोद सूर्यवंशी तर आरोपी नंबर 1तर्फे अँड राजेंद्र फताटे आरोपी नंबर 2 तर्फे अँड नागराज शिंदे आरोपी नंबर ३ तर्फे अँड जयदीप माने हे काम पाहत आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

जा.क्र./नआ/साप्र-४/रजि.नं.६३ **जाहिर प्रसिध्दीकरण** दि.२१/०५/२०२५

पावसाळयाच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे/ चाळी इमारती पावसाच्या मायामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकस पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्तहानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांनी/भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वतः करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारती मधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणेबाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे. यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासणी करुन घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मध्ये २.१.७ Repairs to Bullding तरतूद असून सदर तरतुदीप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस कळवून परवानाधारक आर्कीटेक्ट/ लायसन्स इंजिनिअर /स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली आवश्यकतेप्रमाणे धोकादायक भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर/परवानाधारक इंजिनिअर यांची यादी नगर रचना कार्यालयाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं. २७४०३६४ व ६८, १०१. नगर अभियंता स्टोबर ०२१७-२७४०३३५. या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे. तरी सर्व घर मालकांनी, भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळ्यात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य कारावे.

सही/- डॉ.सचिन ओंबासे भा.प्र.से.
आयुक्त,सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

जा.क्र./नआ/साप्र-४/रजि.नं.६५ **जाहिर प्रसिध्दीकरण** दि.२१/०५/२०२५

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, गट नं. १०/८/१ मौजे सलगरवाडी, सोलापूर येथील रस्ते, ड्रेनेज,दिवाबत्ती व ओपन स्पेस इ.ताब्यात घेणे कामी संबंधित लेआऊटधारक श्री.रहीम महंमद नाईकवाडी यांनी विनंती अर्ज केल्यावरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २२३ व २२४ चे तरतुदीनुसार वरील लेआऊटमधील रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती व ओपन स्पेस इ. सोलापूर महानगरपालिकेचे ताब्यात घेऊन ती सार्वजनिक म्हणून जाहिर करणेत येत आहे. तमाम नागरिकांचे ३० (तीस) दिवसाचे आत सुचना व हरकती न आल्यास हे जाहिर प्रसिध्दीकरण अंतिम समजले जाईल.
ताब्यात घेणेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | आकार (इस्टीमेट प्रमाणे) |
|---|---|---|
| १ | रस्ते | ९१२.०० चौ.मी. |
| २ | दिवाबत्ती | ६ मि.चे एकूण ६ ओक्टागोनल पोल ५० W चे ६ एलईडी स्ट्रीट लाईट फिटिंग |
| ३ | ड्रेनेज | ९५.०० रनिंग मीटर/५.०० नग चेंबर्स |
| ४ | ओपन स्पेस | ८५६.१९ चौ.मी. |

सही/-
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :**
१) फॅशन चित्रपटाची नायिका
२) पानाच्या विड्यात हा वापरतात
३) आंब्याचा रस ४) सूर्य, तपन
५) वैमानिक ६) स्वस्तच्या विरुध्द
८) जुनाच्या विरुध्दार्थी १०) दरारा
१३) धागा गुंडाळण्याची डबी
१५) लिहिण्यासाठी हा वापरतात
१८) राष्ट्रवादीचे सुप्रिमो
२०) बॉडीगार्ड (मराठीत)
२१) फीत २२) हनुमानाचा वार
२३) विना **** नाही उध्दार
२४) माशाचा एक प्रकार
२५) चढ शब्दाच्या विरुध्दार्थी
२७) ** करी काम -एक म्हण
३३) एक पौष्टीक सुका मेवा
३४) अनुष्काचा एक चित्रपट - ** ने बना दी जोडी
३५) श्वास घेताना त्रास होणारा आजार
३७) शहर ३
८) एक माजी मंत्री - विमल ***
३९) देव ४०) गर्दन, सन्मान
४१) दु:ख (हिंदीत)
४४) कासव आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे.

**आडवे शब्द :** १) राहुल गांधी यांच्या भगिनी
३) ठाकरे गटाचे युवासेना प्रमुख (फक्त नाव)
५) अजित पवार यांच्या मुलाचे नाव, अर्जुन
७) ध्येय प्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण करणे - ** ** धन
९) दुधावरील मलई १०) पाच दुणे ११) लहान मोटारगाडी
१२) नियमित वारी करणारे १४) घाई, गडबड
१६) वाकडा शब्दाच्या विरूध्दार्थी १७) पिण्याची क्रिया
१९) एक महिना २०) हत्तीवर बसण्यासाठी बनवलेला हौदा
२३) तीन दुणे २४) अति ** अन् भीक माग - एक म्हण
२५) चरितार्थ, उपजीविका २६) देवाचा आशिर्वाद २८) फ्ल्यू (मराठीत)
२९) छ. शिवरायांची लढण्याची पध्दत - गनिमी **
३०) समर्थ व खंबीर असणे, पात्र असणे ३१) शिरा याच्यापासून बनवितात
३२) ताणला जाणारा घटक ३६) पळणे (इंग्रजीत)
३८) महाराष्ट्राची राजधानी ४०) आईचा भाऊ ४२) उष्ण, तप्त
४३) श्वास घेण्याची क्रिया ४५) आई (इंग्रजीत)
४६) ** घर पोकळ वासा - एक म्हण ४७) पातळ कालवण, पृथ्वी

## सुडोकु - 255

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 8 | | 7 | | | | 2 |
| | 4 | | | 6 | 2 | | 9 | 8 |
| 2 | 9 | 1 | | 3 | | 7 | | |
| | | 6 | 9 | | | 4 | | 7 |
| 3 | 2 | | 6 | | | | 1 | 5 |
| | 7 | | 2 | 5 | 4 | 6 | | 3 |
| | | | 8 | 9 | 1 | 2 | | 6 |
| | | | | 2 | | | 4 | |
| | | | | | | 8 | | 1 |

